# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

**Website- www.sic.maharashtra.gov.in**

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र-६६०/२०१२/जळगाव

| तक्रारदार | प्रतिवादी |
| --- | --- |
| | जन माहिती अधिकारी |
| श्री.दिलीप तुकाराम निकम,<br>रा.लक्ष्मीछाया अर्पाटमेंट, फ्लॅट नं.११, शिवाजी चौक, पाथरवट लेन, पंचवटी, ता.जि.नाशिक ४२२००३. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता.चाळीसगाव, जि.जळगाव. |

विवेचन

अपिलार्थी यांनी दिनांक १४/०९/२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव,जि.जळगांव यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत कुंझर येथील घर नं. ४२५ व अ. नं. ४९५ या मिळकतीबाबत माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी यांच्याकडून ३० दिवसांच्या विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नसल्याने, सदर माहिती अर्जासंदर्भात अपिलार्थी यांनी आयोगाकडे दिनांक १८/०२/२०१२ च्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले होते. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपिल क्र. ६६०/२०१२/जळगांव संदर्भात आयोगासमोर दिनांक २०/०६/२०१३ रोजी झालेल्या सुनावणीअंती आयोगाने दिनांक २०/०६/२०१३ अन्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

*१. अपिलकर्ता यांचे अपिल क्र. ६६०/२०१२ अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. अरुण देशमुख यांनी अपिलकर्त्यास पुन्हा दिनांक १४/०९/२०११ च्या माहितीच्या अर्जाची संपूर्ण माहिती विनामूल्य व्यक्तीश: किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.*

*२. प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अे. एम. राठोड यांच्याकडे ग्रामसेवक पदाचा कार्यभार होता .परंतु त्यांनी अपिलकर्त्यास ३० दिवसांच्या मुदतीत माहिती दिलेली नाही म्हणून त्यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावा.*

२. तदनंतर प्रस्तूत व्दीतीय अपील क्र. ६६०/२०१२/जळगांव संदर्भात दिनांक १९/१२/२०२५ रोजी आयोगासमोर खुलासा सुनावणी ठेवण्यात आली होती.सदर खुलासा सुनावणीअंती आयोगाने दिनांक १२/०२/२०२६ अन्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

*१. प्रस्तूत प्रकरणातील जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव श्री.अे. एम. राठोड यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्तीनंतर १५ दिवसाच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.*

*२. प्रस्तूत प्रकरणातील जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव श्री.अरुण रंगराव देशमुख यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्तीनंतर १५ दिवसाच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.*

३. उपरोक्त आदेशास अनुसरून जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव श्री.अरुण रंगराव देशमुख यांनी आयोगाकडे दिनांक २४/०३/२०२६ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून, त्यात असे नमूद केले आहे की, उपरोक्त विषयान्वये श्री.दिलीप तुकाराम निकम यांचा माहितीचा अधिकार अंर्तगत सादर केलेल्या अपिलाच्या सुनावणी निकालात आदेशित केले नुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाहीबाबत माझा लेखी खुलासा नम्रपणे सादर करीत आहे. श्री दिलीप तुकाराम निकम यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिनांक:- १४/०९/२०११ च्या अर्जान्वये अर्ज देऊन माहिती मागीतली होती, परंतु अर्जदारास सदर माहिती देण्यापूर्वी माझा अपघात झाल्याने मी दिनांक:- २६/०९/२०११ पासुन दिनांक ०५/११/२०११ पर्यंत वैद्यकीय रजेवर होतो.त्यामुळे अर्जदारास वेळेत माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही.

तसेच मी ग्रामपंचायत,खेडगाव येथे ग्रामविकास अधिकारी म्हणुन दिनांक:- १/७/२०११ पासुन कार्यरत होतो व ग्रामपंचायत कुंझर चा माझ्याकडे अतिरीक्त कार्यभार होता दोन्ही ग्रामपंचायती या लोकसंख्येने मोठ्या आहेत. त्यांचा कामकाजाच्या व्यापामुळे दोन्ही ग्रामपंचायतीचे काम करणे अडचणीचे होते, वैद्यकीय रजा उपभोगुन आल्यानंतर पंचायतीचे प्रलंबित कामे पुर्ण केली. यासर्व बाबीमुळे अतिरिक्त ग्रामपंचायतीचा पदभार असलेल्या कुंझर ग्रामपंचायतीकडे प्राप्त अर्जावर कार्यवाही करण्यास विलंब झाला नंतर अर्जदारास त्यांनी सादर केलेल्या अर्जानुसार संपुर्ण माहिती मी दिली आहे.

तरी महोदयांना विनंती की, मी सादर केलेला खुलाशाचा सहानुभुतीपुर्वक विचार करून माझ्याविरुध्द आदेशात नमूद कार्यवाही करू नये,ही नम्र विनंती.

तर प्रस्तूत व्दीतीय अपील क्र. ६६०/२०१२/जळगाव संदर्भात दिनांक १९/१२/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित खुलासा सुनावणीवेळी उपस्थित **जन माहिती अधिकारी ऐ. एम. राठोड** यांनी खुलासा सादर केला असून त्यात असे नमूद केले आहे की, "विनंती पुर्वक खुलासा सादर करतो की, अपीलार्थी श्री. दिलीप तुकाराम निकम,रा. पंचवटी, नाशिक यांचे व्दितीय अपील सुनावणी दिनांक २०/०६/२०१३ रोजीच्या निर्णयानुसार अपिलार्थी श्री.दिलीप तुकाराम निकम रा. पंचवटी, नाशिक यांना माहिती २००५ अन्वये संपुर्ण माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अरुण रंगराव देशमुख यांनी दिली आहे. आपल्या आदेशाचे तंतोतंत पालन करण्यात आलेले आहे. तसेच माझ्याकडे कुंझर ग्रामपंचायतीचा चार्ज नव्हता. माझी तात्पुरती बदली गट विकास अधिकारी,पंचायत समिती चाळीसगाव यांनी केली होती. त्यामुळे माझा खुलासा नम्र पुर्वक सादर करीत आहे."

तसेच, प्रस्तूत व्दीतीय अपील क्र. ६६०/२०१२/जळगाव संदर्भात दिनांक १९/१२/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित खुलासा सुनावणीवेळी उपस्थित यांनी प्रस्तूत प्रकरणी लेखी निवेदन सादर केले असून त्यात असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी माहितीच्या अधिकाराखाली दि.१४/९/२०११ रोजी रजिस्टर पोस्टाने अर्ज श्री.अरुण रंगराव देशमुख यांनी दि.१६/०९/२०११ रोजी अर्ज प्राप्त झाला. घरातील वडीलोपार्जित मिळकती संदर्भात माहिती मागविली होती. परंतु त्यांनी ३० दिवसाच्या मुदतीत उत्तर दिले नाही व त्यांनी ७(१) चा भंग केला आहे.

अपिलार्थी यांनी श्री.नाना ज्योतीराम सुतार व तुकाराम ज्योतीराम सुतार यांच्या नावावर असलेल्या वडिलोपार्जित घर नं-४२५ अनुक्रमांक-४९५ अशी मिळकत असलेले घर तुकाराम ज्योतीराम सुतार यांच्या नावावर होते परंतु सदरची मिळकत सुमनबाई तुकाराम सुतार यांच्या नावावर कुठल्या आधारावर करण्यात आली. त्यासाठी सुमनबाईने कोणकोणती कागदपत्रे दाखल केलेली आहेत. या संदर्भात माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला होता त्यासाठी योग्य ते शुल्क रुपये १००/- ही मनीऑर्डरने पाठवले होते. सदरचे शुल्क स्वीकारुनही आजपावेतो अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली नाही.

अपिलार्थी प्रस्तुत माहिती संदर्भात सुमारे १६ वर्षापासुन अविरत पत्रव्यवहार न्यायालय/ पोलिस ठाणे/ मंत्रालय तसेच नवी दिल्ली/औरंगाबाद मुंबई सर्वोच्च/उच्च न्यायालय यात तसेच सबंधित कार्यालये, माहिती आयुक्त कार्यालयामध्ये वक्तशिरपणे आपले-मोलमजूरीचे काम सोडून पाठपुरावा करीत आहे.

श्री. अरुण रंगराव देशमुख हे भ्रष्ट कर्मचारी असल्याचे पुरावे सोबत आहे. प्रस्तुत कागदपत्रे पाहुन माहिती अधिकार २००५ अधिनियम मधील १९(ख) नुसार रुपये १ वर्ष-३१५ दिवस * १६ वर्ष = ५०४० दिवस = सरासरी मजुरी १०००/- ५०,४०,०००/- सबंधित प्रधिकरणाकडुन नुकसान भरपाई वसुल करणे बाबत आदेश पारीत करावे व त्याच बरोबर अरुण रंगराव देशमुख यांच्या वैयक्तिक मालमत्तेवर टाच आणुन नुकसान भरपाई पुर्ण करावी.

४. प्रस्तूत द्वितीय अपिल प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा दिनांक १४/०९/२०११ रोजीचा माहिती अर्ज ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर,ता.चाळीसगांव, जि.जळगांव या कार्यालयास दिनांक १६/०९/२०११ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यावेळचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्री.अरुण रंगराव देशमुख हे दिनांक २६/०९/२०११ ते ०५/११/२०११ या कालावधीत वैद्यकीय रजेवर असल्याने, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहीत वेळेत प्रतिसाद दिला गेले नसल्याचे निदर्शनास येते. अपिलार्थी यांनी दिनांक १४/०९/२०११ च्या माहिती अर्जान्वये, मागणी केलेली माहिती ही संकलीत करून द्यावयाची असल्याचे निदर्शनास येते. अपिलार्थी यांनी दि.१४/०९/२०११ च्या माहिती अर्जान्वये, मागणी केलेली माहिती ही संकलीत करुन द्यावयाची असल्याचे निदर्शनास येते. तसेच, अपीलार्थी श्री.दिलीप तुकाराम निकम यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, जळगाव यांचेकडे दाखल केलेल्या तक्रार क्र.१७४/२०१३ च्या संदर्भात जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, जळगाव यांचेसमोर झालेल्या सुनावणीअंती दिनांक २९/०४/२०१४ अन्वये पारीत केलेल्या आदेशातील परिच्छेद क्र.४ असे नमूद केलेले दिसते की, तक्रारदार (या अपीलातील अपीलार्थी) यांनी दिलेल्या पत्त्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्री.अरुण रंगराव देशमुख यांनी दिनांक ३१/०७/२०१३ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली असता, पाकीटावर Not Claimed या शे-यासह पाकीट परत आलेले आहे.त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रार अर्जात नमूद पत्त्यावर दिनांक २४/०९/२०१३ रोजी ग्रामपंचायत कार्यालय,कुंझर या लेटर पॅडवर पत्र देवून रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली व तक्रारदार (या अपीलातील अपीलार्थी) यांना सदरची माहिती दिनांक २८/०९/२०१३ रोजी मिळालेली आहे. तक्रारदार (या अपीलातील अपीलार्थी) यांना आवश्यक माहिती मिळाली असून ती त्यांनी स्वीकारली आहे.

अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्री.अरुण रंगराव देशमुख यांनी अपिलार्थी यांना दिनांक २४/०९/२०१३ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविलेली असल्याचे निदर्शनास येते. तसेच, प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर,ता.चाळीसगांव, जि. जळगांव श्री.अरुण रंगराव देशमुख यांनी आयोगाकडे सादर केलेल्या लेखी खुलाशात, जन माहिती अधिकारी हे दिनांक २६/०९/२०११ ते ०५/११/२०११ या कालावधीतील वैद्यकीय रजेवर असल्याने, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना माहिती देण्यास विलंब झाला असल्याचे नमूद केले आहे. म्हणजेच आयोगाने व्दीतीय अपील क्र. ६६०/२०१२/जळगाव संदर्भात दिनांक २०/०६/२०१३ अन्वये पारीत केलेल्या आदेशाचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव श्री.अरुण रंगराव देशमुख यांनी अनुपालन केले असून, अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तूत प्रकरणी आयोगाने व्दीतीय अपील क्र. ६६०/२०१२/जळगाव संदर्भात दिनांक २०/०६/२०१३ अन्वये पारीत केलेल्या आदेशातील निष्कर्ष क्र.२ नुसार कार्यवाही करणे अपेक्षित असल्याने व अपिलार्थी यांना दिनांक २८/०९/२०१३ रोजी माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येत असल्याने व व्दीतीय अपील क्र. ६६०/२०१२/जळगाव संदर्भात यापूर्वीच आयोगाने दिनांक २०/०६/२०१३ अन्वये आदेश पारीत केलेले असल्याने, अपिलार्थी यांची आता केलेली १६ वर्षांची नुकसान भरपाईची मागणी योग्य नाही.त्यामुळे अपिलार्थी यांची नुकसान भरपाईच्या मागणीबाबत आदेश पारीत करणे योग्य नाही.

उपरोक्त सर्व वस्तुस्थिती विचारात घेता, आयोगाने व्दीतीय अपील क्र. ६६०/२०१२/जळगाव संदर्भात दिनांक २०/०६/२०१३ अन्वये पारीत केलेल्या आदेशाचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव श्री.अरुण रंगराव देशमुख यांनी अनुपालन केले असून, अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर

टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही.त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव श्री.अरुण रंगराव देशमुख यांनी केलेला खुलासा समर्थनीय आहे. म्हणून त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव,जि.जळगाव श्री.अरुण रंगराव देशमुख यांनी केलेला खुलासा समाधानकारक असल्याने मान्य करण्यात येऊन प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तूत द्वितीय अपिल क्र. ६६०/२०१२/ जळगांव अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-
जावक क्र. २०६३

24 APR 2026